**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhaji Nagar - 431 004,
Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade

Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218/2403223
Syllabus : (0240) 2403209 / 2403120
Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर. - 431 004,
महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

:: अभ्यासक्रम विभाग ::

**संदर्भ क्र. अभ्यासक्रम विभाग/२०२४/** 24572-74 **दिनांक.:-११.०३.२०२४.**

**प्रति,**
**विद्यापीठाशी संलग्नीत** सर्व शासकीय/अशासकीय,
अनुदानीत/विनाअनुदानित
कला वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषयः-**राज्यातील उच्चशिक्षणाच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण क्रीडा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या आंतरवासिता उपक्रमाबाबत.

**संदर्भः-** १. जा.क.सहसं/उशि/औवि/अनुदान-१-४/२०२४/१०६५ दिनांक ०१.०३.२०२४.
२. शिसंयो/२०२३-२४/आंतरवासिता/योजना-३/२५६१ दिनांक १४.१२.२०२३.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भ १ व २ अन्वये महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण क्रीडा विभागाने प्रायोगिक तत्वावर ३६ जिल्ह्यांमध्ये ४१७ तालुक्यात सुमारे २५०० आंतरवासिता संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतू सदर संधीचा लाभ अत्यंत कमी प्रमाणात विद्यार्थी घेतअसल्याचे निदर्शनास येत आहेत. त्या अनुषंगाने आंतरवासिता उपक्रमअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामधी क्रेडिट (श्रेयांक) आधारित आंतरवासिता अनिवार्य करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या आंतरवासिता कार्यक्रम शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे उपक्रम तातडीने राबविण्यात यावा व राबविलेल्या उपक्रमाच्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल **मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, योजना महाराष्ट्र राज्य, पुणे -१, आणि मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर** यांना उलट टपाली तात्काळ सादर करण्यात यावा, हि विनंती.

**सोबतः- महाराष्ट्र शासन यांच्या पत्राचीप्रत जोडली आहे.**

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक विभाग**
**(अभ्यासक्रम)**

**प्रतिलिपी :-**

१. **मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, योजना महाराष्ट्र राज्य, पुणे -१,** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्त सादर.
२. **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर,** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्त सादर.

**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्चशिक्षण) छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

पदमपूरा, देवगिरी महाविद्यालय जवळ, रेल्वे स्टेशन रोड,छत्रपती संभाजीनगर.

Web: www.jdheaur.org Email Id: jdheaur_2007@rediffmail.com

दूरध्वनी.०२४०-२३३१९१३ फॅक्स २३३१९१३

जा.क. सहसं/उशि/औवि/अनुदान-१-४/२०२४/ 1065 दिनांक :-०१/०३/२०२४

**अत्यंत महत्वाचे**

**प्रति,**

**कुलसचिव,**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

छत्रपती संभाजीनगर

**प्रति,**

**प्राचार्य/संचालक,**

शासकीय महाविद्यालये/संस्था

अशासकीय अनुदानित/कायम विना अनुदानित

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र

तसेच शारिरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये

छत्रपती संभाजीनगर विभाग.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शैक्षणिक विभाग आवक 3923 5/3/2024 छत्रपती संभाजीनगर

**विषय :- राज्यातील उच्चशिक्षणाच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण क्रीडा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या आंतरवासिता उपक्रमा बाबत..**

संदर्भ :- १.शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२४/ प्र क्र १९/ विशि-३ दिनांक २९/०२/२०२४

२.शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय योजना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र शिसंयो/२०२३-२४/ आंतरवासिता / योजना-३/२५६१ दिनांक १४/१२/२०२३

उपरोक्त विषयी शासन पत्र तसेच शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय योजना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील संदर्भिय पत्राच्या प्रती यसोबत अवलोकनार्थ जोडण्यात आलेली आहे.

संचालनालयाकडील संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे राज्यातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने प्रायोगिक तत्वावर ३६ जिल्हयांमध्ये ४१७ तालुक्यात सुमारे २५०० आंतरवासिता संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतू सदर संधीचा लाभ अत्यंत कमी प्रमाणात विद्यार्थी घेतल्याचे निदर्शनास येत आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यामध्ये जागृती होण्याच्या दृष्टीने गुरुवार, दिनांक २२ फेब्रवारी २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार **शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्या समन्वयाने संबंधीत तालुके आणि जिल्हयांतील सर्व विद्यापीठे/महाविद्यालयांसाठी (HEIs) अशा प्रकारची जागृती शिबिरे आयोजित करण्यात यावी.** तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

**(डॉ.सुरेंद्र जी.ठाकुर)**

सहसंचालक, उच्चशिक्षण,

छत्रपती संभाजीनगर विभाग,

छत्रपती संभाजीनगर

सोबत :- शासन पत्र तसेच शिक्षण संचालनालयाचे पत्र

प्रत :-१. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, योजना महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

DR (Acad)
DR (PG)
TPO

Dept of Sports / BSD / Sant-Kumble

MAR 2024

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक४ १८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID: vishi3-hted@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१९/विशि-३ दिनांक : २९ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय: राज्यातील उच्चशिक्षणाच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या आंतरवासिता उपक्रमाबाबत.

राज्यातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता उपक्रम उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने प्रायोगिक तत्वावर ३६ जिल्ह्यांमध्ये ४१७ तालुक्यात सुमारे २५०० आंतरवासिता संधी उपलब्ध केल्या आहेत. परंतु सदर संधीचा लाभ अत्यंत कमी प्रमाणात विद्यार्थ्यांनी घेतल्याचे निदर्शनास येत आहे. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये जागृती होण्याच्या दृष्टीने गुरुवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ०४:०० वा. दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस दिलेल्या निर्देशांनुसार शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्या समन्वयाने संबंधित तालुके आणि जिल्ह्यांतील सर्व विद्यापीठे/ महाविद्यालयांसाठी (HEIs) अशा प्रकारची जागृती शिबीरे आयोजित करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करावा.

सोबत: शिक्षण संचालनालय (योजना) यांनी दिलेल्या
आंतरवासिता उपक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सूचना

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. निवडनस्ती (विशि-३).

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (योजना),महाराष्ट्र राज्य
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१.
दूरध्वनीक्रमांक :-०२०/२६१२६७२६/२६१२३५१५ E-mail Id:- directorscheme.mh@gmail.com

शिसंयो/२०२३-२४/आंतरवासिता/योजना-३/ 2561

Date -14/12/2023

## महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (योजना) ,महाराष्ट्र राज्य,पुणे

### आंतरवासिता कार्यक्रम मार्गदर्शक सूचना

### १.उद्देश : -

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( NEP ) २०२० नुसार पदवी (UG ) आणि पदव्युत्तर पदवी (PG) मधील सर्व अभ्यासक्रमांसाठी क्रेडिट (श्रेयांक) आधारित आंतरवासिता अनिवार्य करण्यात आले आहे. सद्याच्या काळात शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांसामोरील हे एक अनोखे आव्हान आहे. सन २०३० पर्यंत भारतात तरुणांची संख्या मोठी असणार आहे. भारतातील मानवी कौशल्यांचा उपयोग करुन घेण्यासाठी केवळ शिक्षणाचा दर्जा सुधारणे आवश्यक नाही तर त्यांना भविष्यात रोजगाराच्या संधी पुरवण्याच्या दृष्टीने सुसंगत बनवणे देखील आवश्यक आहे.

भारत सरकारने तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. असे असूनही विद्यापीठांमधून पदवीधर झालेल्या बहुंताश विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे हे एक आव्हान आहे. यामध्ये आंतरवासिता (Internship) ची खूप मोठी भूमिका असणार आहे. जगभरात आंतरवासिता (Internship) हे एक प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी सर्वात कार्यक्षम आणि परिणामकारक प्रशिक्षण मानले जाते. यामध्ये संबंधित विषयाचे ज्ञान आणि प्रत्यक्ष कार्य अनुभव एकत्र करण्याची प्रचंड क्षमता आहे. आंतरवासिता (Internship) द्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाची अनुभूती मिळते.

आंतरवासिता (Internship) ही विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित करुन शासकीय यंत्रणेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची संधी आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे राष्ट्रीय धोरणे राबविताना येणा-या वेगवेगळ्या समस्या ,अडचणी व आव्हाणांना सामोरे जावे लागते यावर मात करण्यासाठीच्या उपाययोजना राबविण्याची संधी मिळते त्यामुळे सुजाण नागरिक तयार होण्यास मदत होते. आंतरवासित (Intern) ला सरकारी धोरणांचा विकास व अंमलबजावणीबद्दल माहिती मिळते. सरकारी संस्था आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होते. हे

आंतरवासित (Intern) समाजातील सध्याच्या आव्हाणांना सामोरे जाण्यासाठी नवकल्पना व नविन दृष्टीकोन आणू शकतात, ज्याचा सर्व समाजाला फायदा होऊ शकतो. या सामाजिक फायदयासाठी व विविध योजनांचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करण्यासाठी आंतरवासित (Intern) च्या कमी कालावधीतील सहभागासाठी संरचना निर्माण करण्यासाठी हे आंतरवासिता धोरण महाराष्ट्र सरकार अधिसूचित करते.

**२.उद्दिष्टे : -**

- युवकांना महाराष्ट्र सरकारसोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी देऊन त्यांच्या कौशल्याचा विकास करणे.
- प्रशासन अंतर्गत सार्वजनिक आणि प्रशासनाच्या कार्यप्रणालीची माहिती देणे व प्रशासकीय धोरणांचा विकास आणि अंमलबजावणीबाबत सखोल माहिती देणे.
- सार्वजनिक प्रशासनातील सुशासनासाठी विद्यमान आव्हानांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास प्रोत्साहन देणे.
- सामाजिक समस्यांबद्दल संवेदनशील असणा-या जबाबदार व्यक्तींचा विकास करणे.
- तरुणांमधील नेतृत्व गुणांचा विकास करणे.
- "नवभारत साक्षरता कार्यक्रम" अंतर्गत देशातील १५ वर्ष आणि त्याहून अधिक व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन ,लेखन ) व संख्याज्ञान विकसित करणे.
- देशातील १५ वर्ष आणि त्याहून अधिक व्यक्तींमध्ये मूलभूत शिक्षण देणे.
- स्थानिक रोजगार ,पुनर्कुशलता आणि उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टीकोनातून प्रौढ नव साक्षरांसाठी निरंतर शिक्षण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून देशातील १५ वर्ष आणि त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे.
- "नवभारत साक्षरता कार्यक्रम" अंतर्गत देशातील १५ वर्ष आणि त्याहून अधिक व्यक्तींना निरंतर शिक्षण देणे.

**3.पात्रता :-**

सर्व अर्जदारांनी पुढील पात्रता पूर्ण कराव्यात.

- अर्जदार हा महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठामधून कोणत्याही शाखेत पदवी (प्रथम /द्वितीय/तृतीय) किंवा पदव्युत्तर(प्रथम /द्वितीय) शिक्षण घेणारा असावा.
- आंतरवासिताच्या संपूर्ण कालावधीत पूर्णवेळ उपस्थित रहावे तसेच या कालावधीत इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

**४.आंतरवासिता (Internship) कालावधी :-**

आंतरवासिता किमान तीन महिने या कालावधीसाठी असेल.
आंतरवासिता (Internship) कालावधी खालीलप्रमाणे असेल :
डिसेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४

**५. पदांची संख्या :-**

स्वयंसेवक/आंतरवासिता (Internship) पदांची संख्या -सोबत जोडली आहे.

**६.आंतरवासिता ठिकाण : -**

महाराष्ट्रातील सर्व जिल्हांतर्गत गाव ,नगरपालिका ,महानगरपालिका अंतर्गत ,प्रभाग मधील शाळा.(शाळांची यादी सोबत जोडलेली आहे. )

**७.मानधन -**

सदरील आंतरवासिता कालावधीत कोणत्याही स्वरुपाचे मानधन दिले जाणार नाही.

**८.अर्ज करण्याची प्रक्रिया :-**

- अर्जदारांनी खालील कागदपत्रे अपलोड करावीत.
- पदवी गुणपत्रिका (केवळ पदव्युत्तर अर्जदारांसाठी)
- पूर्ण झालेल्या सेमिस्टरची गुणपत्रिका (पदवी आणि पदव्युत्तर दोन्ही अर्जदारांसाठी)
- बोनाफाईड प्रमाणपत्र/शिफारस/संदर्भ पत्र (विभाग प्रमुखाची स्वाक्षरी असलेले)
- पासपोर्ट आकाराचे छायाचित्र
- महाविद्यालयाच्या विभाग प्रमुखांचे विहित नमुन्यातील शिफारस पत्र .
- महाविद्यालयाचे ओळखपत्र

**९. निवड प्रक्रिया :-**

- निवड ही तालुकास्तरावर गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती /प्रशासन अधिकारी महानगरपलिका /नगरपालिका कार्यालय यांचेकडून करण्यात येईल .
- निवड ही मुलाखतीच्या आधारे केली जाईल .
- निवडलेल्या उमेदवाराची यादी उमेदवारांना ईमेलद्वारे आणि अधिकृत वेबसाईटद्वारे कळविले जाईल.
- **निवड समिती पुढील प्रमाणे असेल -**

  निवड समिती

  ५) अध्यक्ष –गट शिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी

६) सदस्य क्र १ - विस्तार अधिकारी

७) सदस्य क्र २ – केंद्रप्रमुख

८) सदस्य सचिव –ज्येष्ठ विस्तार अधिकारी

**१०.आंतरवासित (Intern) आणि आंतरवासिता प्रक्रियेचे निरीक्षण व मूल्यांकन**

- **आंतरवासित** देण्यात आलेले कार्य वाटप आणि दैनंदिन उपस्थिती अहवाल हा नियुक्ती विभाग, कार्यालय यांना सादर करण्यात येईल.
- आंतरवासित (Intern) ची दैनंदिन उपस्थिती नोंदविली जाईल.
- आंतरवासित (Intern) ने साप्ताहिक कार्य अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**११.नियम :-**

आंतरवासित (Intern) ने खालील नियम पाळावेत.

- विभागाच्या कर्मचा-यांना लागू असणा-या नियमांचे आंतरवासितने पालन करावे.
- आंतरवासित विभागाच्या गोपनियतेचे पालन करेल आणि विभागाची कोणतीही माहिती उघड करणार नाही.
- विभागामध्ये केलेल्या कामाच्या कोणत्याही बौध्दिक संपत्तींच्या अधिकारावर आंतरवासिता दावा करणार नाही. आणि विभागाच्या बौध्दिक मालमत्तेची गोपनियता काटेकोरपणे राखेल. आंतरवासितच्या कोणत्याही नियमांच्या उल्लंघनास संस्थेकडून योग्य ती कारवाई अनुसरण्यात येईल.
- प्रकल्पाच्या कामा दरम्यान निर्माण केलेल्या पेटंट, डिझाईन्स, सॉफ्टवेअर कॉपीराईट (स्त्रोत कोड) आणि प्रकाशनातील सर्व बौध्दिक संपदा यावर विभागाचा अधिकार असेल आंतरवासित व प्रायोजक संस्था यांचा कोणताही दावा असणार नाही.
- आंतरवासित त्यांचे कार्य विभागाच्या पुर्वपरवानगीने शैक्षणिक संस्था आणि सेमिनार/ परिषदांमध्ये सादर करु शकतात. तथापि यासाठीही विभागासाठी असणारी गोपनिय माहिती कोणत्याही परिस्थितीत उघड करता येणार नाही.
- आंतरवासितने लिहिलेले आणि प्रकाशित केलेले कोणतेही कागदपत्रे आणि दस्तऐवज इत्यादी विभागाची मते नसून त्याची वैयक्तिक मते आहेत. याबाबत दक्ष असावे.
- आंतरवासितांनी इतरांना प्रतिनिधीत्व देण्याबाबत विभागाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करतील.

- आंतरवासित (Intern) विभागासंदर्भात मिडियाशी संवाद साधू शकणार नाही.
- आंतरवासिताने (Intern) विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी वर्तन चांगले ठेवावे.
- आंतरवासितास(Intern) देण्यात आलेल्या कार्यालयामध्ये/ विभागामध्ये पूर्णवेळ उपस्थित राहील. पूर्वपरवानगीशिवाय अनुपस्थित राहता येणार नाही.
- आंतरवासिता दरम्यान आंतरवासितने स्वतःची निवास व्यवस्था स्वतः करावी.
- असमाधानकारक कामगिरी असल्याचे निदर्शनास आल्यास विभागाकडून त्याची आंतरवासिता समाप्त किंवा रद्द केले जाऊ शकते.

**१२.प्लेसमेंट :-**

- आंतरवासिता म्हणजे विभागातील रोजगाराची हमी नाही .

**१३.अहवाल/पेपर सादर करणे :-**

- विभागाद्वारे देण्यात आलेले कामकाज आणि कामाचे वेळापत्रक याचे आंतरवासितने पालन करावे.
- आंतरवासिताच्या शेवटी आंतरवासितने कामाचा अहवाल विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.
- आंतरवासितने प्रायोजक संस्थेसाठी आणि विभागासाठी सादर केलेला प्रकल्प अहवाल समान असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने प्रकल्पाचे काम पूर्ण केल्यानंतर प्रकल्प अहवालाची सॉप्ट कॉपी व हार्ड कॉपी सादर करणे आवश्यक आहे.

**१४.समाप्ती :-**

- आंतरवासितच्या सेवांची यापुढे आवश्यकता नसल्यास विभाग एखादया आंतरवासितचा कालावधी समाप्त करु शकतात.
- आंतरवासितने (Intern) स्वेच्छेने आंतरवासिता समाप्त करण्याचा निर्णय घेतल्यास त्याने २ आठवडे अगोदर संबंधित विभागाला पूर्व सूचना दयावी.
- आंतरवासित संपल्यानंतर विभागासोबत त्याच्या/तिच्या प्रकल्पाच्या कार्या दरम्यान विभागाने आंतरवासितला (Intern) दिलेली कोणतीही कागदपत्रे उपकरणे किंवा इतर मालमत्ता यामध्ये देण्यात आलेले बॅच किंवा आयडी कार्ड विभागाला सुपूर्द करण्यात यावे.
- विभागाने आंतरवासितची सेवा संमाप्त केल्यानंतरदेखील विभागासाठी अजूनही काम करत असल्याचे निदर्शनास आल्यास विभागाकडून आंतरवासितवर योग्य कारवाई करण्यात येईल.
- चूक करणा-या आंतवासितवर सक्षम प्राधिकारी योग्य ती कारवाई करु शकतात व सक्षम प्राधिका-याचा निर्णय अंतिम असेल आणि आंतरवासितवर बंधनकारक असेल.

**कामाचे स्वरूप -**

खालील शासन निर्णयामध्ये व परीपत्रकांमध्ये निर्देशित करण्यात आलेले आहे .

३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक नभासाका, ०३२२/प्र३९/एस.डी .२ दिनांक १४/१०/२०२२

४) शिक्षण संचालक , शिक्षण संचलनालय (योजना ) या कार्यालयाचे स्वयंसेवक व निरक्षरांचे सर्वेक्षण तसेच कामकाजाची मार्गदर्शक नियमावली

३) शिक्षण संचालक , शिक्षण संचलनालय (योजना ) या कार्यालयाचे पत्र जा क्र शिसयो /नभासा/मार्गदर्शक सूचना /२०२३-२४/१६८२ ,दि.११/०८/२०२३

४) आंतरवासिता (Internship) कार्यक्रम नियोजन

(डॉ.महेश पालकर)
शिक्षण संचालक
शिक्षण संचालनालय (योजना)
महाराष्ट्र राज्य, पुणे